## घर असावे घरासारखे
## नकोत नुसत्या भिंती ..........

शुभ दीपावली

बरोबर, नुसत्या भिंतींनी घर बनत नाही तर घराला 'घरपण' येते ते त्यात राहणाऱ्या कुटुंबामुळे.

कुटुंब केवळ तीन अक्षरी शब्द. पण हाच शब्द जेव्हा तीन पिढ्यांना एकत्र ठेवतो त्यावेळी त्या भोवतालच्या चार भिंतींना 'घर' म्हटलं जातं. तीन पिढ्यात जर सुसंवाद असेल तर त्या झाडाखाली राहिल्या तरी त्याला कुटुंब म्हटलं जातं. याचाच अर्थ 'कुटुंब' महत्त्वाचं. कुटुंब देतं मायेची ऊब, व्यक्तिमत्वाला आकार, जीवनाला दिशा, समाजाला आधार. शिक्षणाचा व्यवहार विद्यापीठात घडतो पण व्यवहाराचं शिक्षण मिळतं ते 'कुटुंब' नावाच्या विद्यापीठात.

अध्यापक, उद्योजक, अभियंते, कलाकार, साहित्यिक, सामाजिक नेतृत्व या साऱ्यांचं प्रथम प्रकटीकरण घडतं ते कुटुंबातील व्यासपीठावर. 'गल्ली ते दिल्ली' सामाजिक व्यवहाराची साखळी व्यवस्थित ठेवणारा दुवा म्हणजे कुटुंब. पुराणात, इतिहासात, वर्तमानात, समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात आपण डोकावून पाहिलं तर 'कुटुंब' आपल्याला सहज भेटतं.

'कुटुंब' हा आपला सांस्कृतिक वारसा आहे आणि तोच आपल्या उज्वल भविष्याचा आधारही आहे.

'मी' ला 'आम्ही' करणारे 'कुटुंब' अनेकांना घडविते, अनेक क्षेत्रांना समृद्ध करते. या 'कुटुंबाविषयी बरंच' काही सांगणार आहेत अनेक मान्यवर, आपल्या प्रतिभासंपन्न लेखणीच्या आविष्काराच्या माध्यमातून. सांस्कृतिक वार्तापत्र घेऊन येत आहे.

'मी' ला 'आम्ही' करणारे 'कुटुंब' दिवाळी अंक २०२३

कुटुंब हा आपला सांस्कृतिक वारसा आहे आणि तोच आपल्या उज्वल भविष्याचा आधारही आहे. म्हणूनच आम्ही 'कुटुंब' हा विषय दिवाळी अंकासाठी घेतला. कुटुंब संस्कृती टिकवायची तर तिचे पैलू लक्षात घेणे गरजेचे आहे.

- कुटुंब परंपरेची प्राचीनता
- विविध कुटुंब पद्धती
- गृहस्थ धर्म
- सजग पालकत्व
- साहित्यात डोकावणारं 'कुटुंब'
- राजकारणी कुटुंबे
- कुटुंबातील राजकारण
- विकसित कुटुंब – राष्ट्राचा आधार
- व्यवस्थापनाचं विद्यापीठ – कुटुंब
- ज्येष्ठांविषयीची कर्तव्ये

अशा अनेक विषयांवरील नामवंतांचे विचार तसेच 'मला घडवलं कुटुंबानं' या विभागात साहित्य, अभिनय, संगीत, राजकारण, समाजकारण, उद्योग अशा विविध क्षेत्रातील यशस्वी व्यक्तींच्या मुलाखती / परिचय; याशिवाय कुटुंबाविषयी बरंच काही... सांस्कृतिक वार्तापत्राच्या 'कुटुंब' दिवाळी अंकात. आपल्या सोन्यासारख्या कुटुंबात या अंकाची सोनपावलं दसऱ्याच्या मुहूर्तावर पडायलाच हवीत.


## सांस्कृतिक वार्तापत्र

सी १, शालिनी रेसिडेन्सी - गेट नं २, आय.सी.आय. सी. आय. बँकेची इमारत, हिंगणे बु., कर्वेनगर, पुणे ४११०५२
संपर्क (०२०) २९९५२०३७, ९६०४९९३७१५

Sankrutik Vartapatra